स्थापना:१९७०

स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद- कर्मवीर
रयत शिक्षण संस्थेचे,

# कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा

जि. सोलापूर (महाराष्ट्र), पिन-४१३२०९
सोलापूर विद्यापीठ संलग्नित
**संस्थापक: पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील, डी.लिट.**

Jr. College Index No- २४.०४.००१

STD (०२१८३)
Office: २३४०२६
Fax: २३४०५३

Principal:
Dr. Dhere S.R.
M.Com. Ph.D.

NAAC Accredited: घङCGPA- २.४७, Web-www.accmadha.com, E-mail: accmadha@yahoo.com

Ref. No. : 618 /2018-19

Date: 18/3 /2019

प्रति,
मा. शाखाधिकारी,
दि. रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँक ,सातारा.
शाखा- पंढरपूर
जि.सोलापूर

विषय -बँकेचे सभासद असल्याबददल आपली सही मिळणे बाबत.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन या महाविद्यालयातील आपल्या बँकेचे सभासद आहेत.त्यांची यादी सोबत पाठवून देत आहे. आपल्या रेकॉर्ड वरुन तपासून बँकेचे सभासद असले बाबत आपली सही करुन पाठवून द्यावी. हे महाविद्यालय नॅकला सामोरे जात आहे. त्यासाठी बँकेचे सभासद असल्याबाबतची माहिती आवश्यक आहे.

तरी सदरच्या यादीवर आपण आपली सही व शिक्का देऊन सहकार्य करावे ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

प्राचार्य,
कला व वाणिज्य महाविद्यालय,
माढा.जि.सोलापूर

Arts & Commerce College Madha

Principal,
Arts & Commerce College
Madha,Dist.Solapur

Arts & Commerce College Madha

Scanned by CamScanner

# ARTS AND COMMERCE COLLEGE,
# MADHA. DIST. SOLAPUR
## LIST OF RAYAT BANK MEMBERSHIP
### TEACHING & NONTEACHING STAFF

| SR NO | NAME OF THE MEMBER | Membership No |
|---|---|---|
| 1 | 2 | 3 |
| 1 | Prin.Dr.DHERE S.R. | 15636 |
| 2 | Dr.Ubale P.P. | 13027 |
| 3 | SHRI. TAKBHATE P.V. | 13152 |
| 4 | SHRI.KADAM A.V. | 16992 |
| 5 | SHRI.ANANTKAWALS M.B. | 19814 |
| 6 | SHRI. KORI M.L. | 19768 |
| 7 | SHRI.LONDHE A.B. | 19607 |
| 8 | SHRI.SHINDE S.K. | 21026 |
| 9 | SHRI.GAIKWAD P.G. | 20587 |
| 10 | MISS. DIKONDA R.G. | 23949 |
| 11 | SHRI. DIKONDA G.K. | 23037 |
| 12 | SHRI.SHINDE N.V. | 23418 |
| 13 | SHRI GENGAJE S.H. | 17551 |
| 14 | MRS. PATIL N.R. | 21373 |
| 15 | SHRI SAPATE R.H. | 12334 |
| 16 | SHRI GHADAGE B.T | 14515 |
| 17 | SHRI RANDIVE M.B. | 21374 |
| 18 | SHRI POUL Y.R. | 20721 |
| 19 | SHRI DHUMAL R.M. | 15639 |

True Copy

Principal,
Arts & Commerce College
Madha,Dist.Solapur

Branch Manager
The Rayat Sevak Co-op. Bank Ltd. Satara
Branch-Pandharpur

Scanned by CamScanner

# दि रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँक लि., सातारा

मुख्य कार्यालय :- ४५३/२/२० फ, पेठ सदरबझार, सातारा - ४१५ ००१
फोन नं.(०२१६२) २३१३१३, २३१३१४, २३१८३१, २२२३१५
E-mail - rayatbank.ho@gmail.com
Website :- www.rayatsevakbank.com


जा.क्र.:- ९००/प्रशासन/२०१७-१८

दि.०१/०८/२०१७

## ♣ परिपत्रक क्र.३ ♣

बँकेच्या कामकाजासंबंधी सर्व सभासद बंधू-भगिनींच्या माहितीसाठी खालीलप्रमाणे माहिती कळवित आहोत.

१) **गरीब, निराधार व अनाथ मुलांच्या मदतीसाठीच्या माहितीबाबत :-**

आपल्या बँकेच्या मुख्य कार्यालयाकडील जा.क्र.७६३/प्रशासन/२०१७-१८ दि.१३/०७/२०१७ रोजीच्या परिपत्रक क्र.२ मधील मुद्दा क्र.२ नुसार गरीब, निराधार व अनाथ मुलांच्या मदतीसाठी माहिती पाठविणेविषयी कळविलेले होते. त्यामध्ये ''आई-वडील नसलेला विद्यार्थी / विद्यार्थिनी असणे आवश्यक'' अशी अट नमूद होती. परंतु बँकेच्या संचालक मंडळाच्या दि.३०/०६/२०१७ रोजी झालेल्या बैठकीमध्ये याबाबत चर्चा करणेत येवून ज्या गरीब, निराधार व अनाथ मुलांना आई आहे पण वडील नाहीत किंवा वडील आहेत पण आई नाही अशा विद्यार्थी / विद्यार्थिनींची माहिती मागविण्यात यावी, असे ठरविणेत आलेले आहे. याबाबतीत इतर निकष पूर्वीप्रमाणेच राहतील. तसेच इ.११ वी नंतरचे पुढील शिक्षण रयत शिक्षण संस्थेत घेत असणे आवश्यक आहे. त्यानुसार संबंधित विद्यार्थ्यांची माहिती उशीरात उशीरा गुरुवार दि.१० ऑगस्ट २०१७ अखेर आपल्या बँकेच्या संबंधित शाखेत पोहोचेल अशी पाठवावी.

२) **आधार कार्ड संलग्न करुन घेणेबाबत :-**

रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार बँकेतील खातेदारांनी त्यांच्या सेव्हिंग्ज ठेव किंवा इतर खात्याला आधार कार्ड संलग्न करणे बंधनकारक आहे. त्यामुळे आपल्या बँकेच्या ज्या सभासदांनी त्यांचे आधार कार्ड संबंधित शाखेतील सेव्हिंग्ज ठेव खात्याशी संलग्न करुन घेतले नसेल, त्यांनी ते सत्वर करुन घेणे आवश्यक आहे. तरी सर्व सभासद बंधू-भगिनींना विनंती करणेत येते की, त्यांनी आपल्या बँकेच्या संबंधित शाखेमध्ये जावून आधार कार्ड संलग्न करुन घ्यावे.

कृपया सदरचे परिपत्रक आपल्या शाखेतील सर्व सेवकांच्या निदर्शनास आणावे, ही नम्र विनंती.

(शिवाजी हरी फडतरे)
प्रभारी सरव्यवस्थापक,
दि रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँक लि., सातारा

**प्रत माहितीसाठी :-**

१. मा.चेअरमनसो / व्हा.चेअरमनसो, सर्व संचालकसो,
दि रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँक लि., सातारा

२. श्री. विभागप्रमुख / शाखाधिकारी,
दि रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँक लि., सातारा मुख्य कार्यालय व सर्व शाखा.

PARIPATRAK-3-2017-18

**True Copy**

Principal,
Arts & Commerce College
Madha Dist.Solapur

Arts & Commerce College Madha

# दि रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँक लि., सातारा

मुख्य कार्यालय :- ४५५/२/२० फ, पेठ सदरबझार, सातारा - ४१५ ००१
फोन नं.(०२१६२) २३१३१३, २३१३१४, २३१८३५,२३३३१५
E-mail - rayatbank.ho@gmail.com
Website :- www.rayatsevakbank.com


जा.क.:- १२८५/प्रशासन/२०१७-१८ दि.०६/०९/२०१७

## ♣ परिपत्रक क.४ ♣

बँकेच्या कामकाजासंबंधी दि.१९/०८/२०१७ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेमध्ये काही महत्वपूर्ण निर्णय घेणेत आलेले आहेत. ते सर्व सभासद बंधू-भगिनींच्या माहितीसाठी खालीलप्रमाणे माहिती कळवित आहोत.

### १) कर्ज व्याजदरात कपात :-

बँकेच्या सन् २०१६-१७ या आर्थिक वर्षाचा व सन् २०१७-१८ या आर्थिक वर्षामधील पहिल्या तिमाहीचा आढावा घेऊन, कर्जावरील व ठेवीवरील व्याजदराचा दुरावा विचारात घेऊन तसेच सभासदांकडून कर्जावरील व्याजदर कमी करण्यासंबंधी वारंवार होणाऱ्या मागणीचा विचार करुन बँकेतर्फे देण्यात येणाऱ्या वाहन तारण कर्जावरील व्याजदर १ टक्का व इतर सर्व कर्जावरील व्याजदर दि.२१/०८/२०१७ पासून ०.५० टक्केने कमी करण्यात आलेले आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ. नं. | कर्ज प्रकार | | जुने व्याजदर (द.सा.द.शे.) | दि.२१/०८/२०१७ पासून लागू झालेले नवीन व्याजदर (द.सा.द.शे.) |
|---|---|---|---|---|
| १. | जा.कर्ज नं.१ | ₹ ६ लाखापर्यंतच्या मंजूर कर्जास<br>₹ ६ लाखाचे वरील मंजूर कर्जास | ११.७५ टक्के<br>१२.२५ टक्के | ११.२५ टक्के<br>११.७५ टक्के |
| २. | जा.कर्ज नं.२ | ₹ ५ लाख | १०.७५ टक्के | १०.२५ टक्के |
| ३. | जा.कर्ज नं.३ | ₹ ३ लाख | १०.५० टक्के | १०.०० टक्के |
| ४. | विशेष(घरबांधणी) कर्ज | ₹ १२ लाखापर्यंतच्या मंजूर कर्जास<br>₹ १२ लाखाचे वरील मंजूर कर्जास | ०९.७५ टक्के<br>१०.५० टक्के | ०९.२५ टक्के<br>१०.०० टक्के |
| ५. | घरतारण कर्ज | ₹ १० लाखापर्यंतच्या मंजूर कर्जास<br>₹ १० लाखाचे वरील मंजूर कर्जास | १०.५० टक्के<br>११.२५ टक्के | १०.०० टक्के<br>१०.७५ टक्के |
| ४. | शैक्षणिक कर्ज | | १०.२५ टक्के | ०९.७५ टक्के |
| ५. | वाहनतारण कर्ज | | १०.५० टक्के | ९.५० टक्के |
| ६. | सोनेतारण कर्ज | | १२.०० टक्के | ११.५० टक्के |

वरीलप्रमाणे कर्जावरील बदललेले व्याजदर हे दि.२१/०८/२०१७ पूर्वी घेतलेल्या कर्जास व त्यापुढे घेतल्या जाणाऱ्या सर्व कर्जास लागू राहतील.

### २) जामिनकी कर्ज नं.१ च्या कर्ज मर्यादेत वाढ :-

आपल्या बँकेच्या जामिनकी कर्ज नं.१ ची मर्यादा रु.१३ लाख इतकी होती. सदरची मर्यादा दि.२१/०८/२०१७ पासून रु.१५,००,०००/- इतकी करण्यात आलेली आहे. परतफेडीचे हप्ते पूर्वीप्रमाणेच १६० ठेवणेत आलेले आहेत.

--कृ.मा.प.--

Arts & Commerce College Madha

Scanned by CamScanner

३) **जामिनकी कर्ज नं.३ च्या कर्ज मर्यादेत वाढ :-**

आपल्या बँकेच्या जामिनकी कर्ज नं.३ ची मर्यादा रु.१ लाख इतकी होती. सदरची मर्यादा दि.२१/०८/२०१७ पासून रु.३,००,०००/- इतकी करण्यात आलेली आहे. परतफेडीचे हप्ते पूर्वीप्रमाणेच १५ ठेवणेत आलेले आहेत.

४) **जामिनकी कर्ज नं.४ ची योजना बंद केलेबाबत :-**

आपल्या बँकेमार्फत जामिनकी कर्ज नं.१ ई.एम.आय. व जामिनकी कर्ज नं.४ हे नॉन ई.एम.आय. पध्दतीने दिले जात होते. परंतु जामिनकी कर्ज नं.४ नॉन ई.एम.आय. ची मागणी जास्त होत नसल्याने सदरची कर्ज योजना दि.२१/०८/२०१७ पासून बंद करणेत आलेली आहे.

५) **जामिनकी कर्ज नं.१,२,३ साठी लेटर ऑफ लिन ॲन्ड सेट ऑफ बाबत (धारणाधिकार):-**

आपल्या बँकेमार्फत जा.कर्ज नं.१,२ व ३ आदा करतेवेळी रु.१००/- चा करारनामा घेतला जात होता. परंतु सदर कर्ज आदा करताना कर्ज अर्जासोबत लेटर ऑफ लिन ॲन्ड सेट ऑफ (धारणाधिकार) जोडलेला आहे तो रु.१००/- चे ॲडेसिव्ह स्टॅम्पवर घेणेत यावा, असे आपल्या बँकेचे शासकीय लेखापरीक्षक यांनी सुचविलेले आहे. त्यानुसार दि.०१/०९/२०१७ पासून जामिनकी कर्ज नं.१,२ व ३ या कर्जासाठी लेटर ऑफ लिन ॲन्ड सेट ऑफ (धारणाधिकार) रु.१००/- चे बॉन्डवर देणेचा आहे. याबाबत बँकेने लेटर ऑफ लिन ॲन्ड सेट ऑफ यास ॲडेसिव्ह स्टॅम्प लावून दयावयाची व्यवस्था केलेली आहे. त्यामुळे जा.कर्ज नं.१,२ व ३ आदा करतेवेळी अर्जासाठी एकत्रित रु.२००/- सभासदांना द्यावे लागतील.

६) **विशेष (घरबांधणी) कर्ज मर्यादेबाबत :-**

आपल्या बँकेमार्फत वैयक्तिक विशेष (घरबांधणी) कर्ज रु.४० लाख व संयुक्त पती / पत्नी साठी विशेष (घरबांधणी) कर्ज रु.८० लाख देणेत येत होते. या दोन्हीसाठी परतफेडीचे हप्ते २४० आहेत. परंतु रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या तपासणी अधिकाऱ्यांनी संयुक्त पती / पत्नी यांचेसाठी विशेष (घरबांधणी) कर्ज मर्यादा रु.७० लाखांपेक्षा जास्त असू नये, असा शेरा दिलेला आहे. त्यामुळे दि.०१/०९/२०१७ पासून संयुक्त पती / पत्नी यांचेसाठी घरबांधणी कर्ज मर्यादा रु.७० लाख इतकी करणेत आलेली आहे. परंतु परतफेडीच्या हप्त्यामध्ये कोणताही बदल करणेत आलेला नाही. ते हप्ते पूर्वीप्रमाणेच २४० इतके राहतील. विशेष (घरबांधणी) कर्जाचा मागणी अर्ज, तारण सातत्य करारनामा व लेटर ऑफ लिन ॲन्ड सेट ऑफ यास प्रत्येकी रु.१००/- चे बॉन्ड लावावे लागतील.

७) **प्लॉट खरेदी कर्जाबाबत :-**

आपल्या बँकेच्या विशेष (घरबांधणी) कर्ज योजनेअंतर्गत प्लॉट खरेदीसाठी कर्ज आदा केले जात होते. परंतु रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या परिपत्रकानुसार विशेष (घरबांधणी) कर्ज योजनेअंतर्गत प्लॉट खरेदीसाठी कर्ज देता येत नाही. त्यामुळे दि.०१/०९/२०१७ पासून विशेष (घरबांधणी) कर्ज योजनेअंतर्गत प्लॉट खरेदीसाठी कर्ज आदा करता येणार नाही.

--३--

Arts & Commerce College Madha

Scanned by CamScanner

## ८) जामिनकी कर्ज नं.१ च्या वजावट कर्ज नियमात सवलत :-

बँकेच्या प्रचलित कर्ज नियमात जामिनकी कर्ज नं.१ च्या कर्जफेडीच्या मुदतीपैकी कर्ज घेतलेच्या तारखेपासून १/१० कालावधी पूर्ण झालेनंतर तसेच नियमित वेतनातून १/१० हप्त्याची परतफेड झालेनंतर वजावटीने कर्ज मिळण्याची तरतूद आहे. परंतु दसरा व दिपावलीचे औचित्य साधून सभासदांना कर्जाचा लाभ घेता यावा म्हणून सभासद कर्जदाराने यापूर्वी घेतलेल्या कर्जाच्या हप्त्यांपैकी १/१० हप्ते व कालावधी पूर्ण झालेला नसला तरी त्या सभासदांना फक्त जामिनकी कर्ज नं.१ वजावटीने देणेची सुविधा दि.२२/०९/२०१७ ते दि.२२/११/२०१७ या कालावधीत उपलब्ध करून देणेचे ठरलेले आहे. ज्या सभासदांकडे जामिनकी कर्ज नं.४ (नॉन ई.एम.आय.) कर्ज येणे आहे व त्यांना वजावटीने जामिनकी कर्ज नं.१ हवे असल्यास त्यांना जामिनकी कर्ज नं.१ मंजूर करुन त्यातून त्यांचेकडील येणे असलेले जामिनकी कर्ज नं.४ (नॉन ई.एम.आय.) वसूल करणेत येईल. दि.२३/११/२०१७ पासून पुढे पूर्वीप्रमाणेच वजावटीचे नियम लागू राहतील.

## थकबाकीदार सभासद,एन.पी.ए.थकबाकीदार सभासद, लवाद दावा / कलम १०१ अंतर्गत कारवाई करणेत आलेल्या सभासदांबाबत :-

जे सभासद वरील कारणास्तव थकबाकीदार झालेले आहेत अशा सभासदांना दि.२२/०९/२०१७ ते दि.२२/११/२०१७ या कालावधीमध्ये खालील बाबींचा विचार करुन कर्ज देण्याचा निर्णय घेतलेला आहे.

अ) ज्या सभासदांच्या कर्जाचे १ किंवा २ हप्ते थकलेले आहेत, अशा सभासदांकडून थकीत कर्जाची रक्कम व्याजासह भरुन घेऊन दुसऱ्या दिवशी वजावटीने कर्ज देणेत येईल.

ब) ज्या सभासदांच्या कर्जाचे ३ किंवा ३ पेक्षा जास्त हप्ते मुद्दलाने किंवा व्याजाने थकलेले आहेत व सदरचे खाते एन्.पी.ए. झालेले आहे, अशा सभासदांनी हप्ते थकलेचे कारण व यापुढे हप्ते थकविले जाणार नाहीत अशी लेखी हमी घेवून त्यावर त्यांच्या शाखाप्रमुखांची 'दरमहा कर्जाचे नियमित हप्ते बँकेकडे पाठविणेत येतील' अशी स्पष्ट लेखी शिफारस घ्यावी. तद्नंतर सदरच्या विनंती अर्जावर बँकेच्या संबंधित शाखा समितीचे चेअरमन यांची शिफारस घेऊन सदरच्या कर्जाची संपूर्ण व्याजासह येणे बाकी भरुन घेतलेनंतर दुसऱ्या दिवशी संबंधित सभासदास कर्ज देणेत येईल. अशा सभासदांना वजावटीने कर्ज देता येणार नाही.

क) ज्या सभासदांच्या कर्जाचे खाते १ वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीसाठी व एन.पी.ए.म्हणून असेल त्या सभासदांना त्यांचेकडील संपूर्ण कर्ज रक्कम परतफेड केलेनंतर त्यांना पुन्हा कर्ज हवे असेल तर त्यांनी भरलेली संपूर्ण कर्ज रक्कम, त्यांच्याकडील इतर येणे कर्ज, सभासद कल्याण ठेव खाती कमी असणारी रक्कम व कोर्ट खर्च इ.रक्कमा अधिक त्या सभासदास तातडीची गरज म्हणून जास्तीत जास्त रु.२५,०००/- जादा रक्कमेच्या मर्यादेपर्यंत कर्ज, शाखा समिती चेअरमन यांची शिफारस झालेनंतर देण्यात येईल. तसेच अशा सभासदास पुढील एक वर्ष कालावधीत इतर कोणत्याही प्रकारचे कर्ज देता येणार नाही. अशा प्रकारे कर्ज आदा केलेपासून एक वर्ष पूर्ण झालेनंतर व त्या संबधित सभासद कर्जदाराचे कर्ज खाते नियमित व समाधानकारक सुरु राहिल्यास नियमाप्रमाणे पात्र कर्ज देणेत येईल.

--कृ.मा.प.--

Scanned by CamScanner

ड) ज्या थकबाकीदार सभासदांवर लवाद दावे, कलम १०१ अंतर्गत दावे दाखल केलेले आहेत, अशा सभासदांनी त्यांचेकडून येणे असलेले कर्ज, व्याज, दंड व्याज व कोर्ट खर्चाची रक्कम भरुन त्यांना नवीन कर्ज हवे असेल तर त्या कर्जदार सभासदांनी कर्ज अर्जासोबत हप्ते थकविले जाणार नाहीत, याबाबत लिखीत हमीपत्र व त्यावर त्यांच्या शाखाप्रमुखांची 'दरमहा कर्जाचे नियमित हप्ते बँकेकडे पाठविणेत येतील' अशी स्पष्ट शिफारस घ्यावी. तद्नंतर सदरच्या कर्ज अर्जावर बँकेच्या संबंधित शाखा समितीचे चेअरमन यांची कर्ज मंजूर करणेबाबत शिफारस झालेनंतर व त्या सभासदांनी संपूर्ण येणे कर्ज, व्याज, दंड व्याज, कोर्ट खर्च इ. ची रक्कम भरलेनंतरच मुख्य कार्यालयाच्या मंजुरीने कर्ज आदा करणेत येईल. तसेच संबंधित सभासदांनी लवाद दावा काढून घेणेबाबतचा लेखी विनंती अर्ज मुख्य कार्यालयाकडे पाठविणेसाठी आपल्या बँकेच्या संबंधित शाखेत देणे आवश्यक आहे.

९) <u>आधार कार्ड संलग्न करुन घेणेबाबत :-</u>

रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार बँकेतील खातेदारांनी त्यांच्या सेव्हिंग्ज ठेव किंवा इतर खात्याला आधार कार्ड संलग्न करणे बंधनकारक आहे. त्यामुळे आपल्या बँकेच्या ज्या सभासदांनी त्यांचे आधार कार्ड संबंधित शाखेतील सेव्हिंग्ज ठेव खात्याशी संलग्न करुन घेतले नसेल, त्यांनी ते सत्वर करुन घेणे आवश्यक आहे. तरी सर्व सभासद बंधू-भगिनींना विनंती करणेत येते की, त्यांनी आपल्या बँकेच्या संबंधित शाखेमध्ये जावून आधार कार्ड संलग्न करुन घ्यावे.

१०) <u>वेतन दाखल्याबाबत :-</u>

ज्या सभासद कर्जदारांना कर्ज हवे असेल त्यांनी वेतन दाखला भरताना तो त्यांच्या पगारपत्रकाप्रमाणे वस्तुनिष्ठ वेतन दाखला भरणे आवश्यक आहे. उदा. सभासद कायम ठेव, सर्व कर्जाच्या कपाती, डी.सी.पी.एस., इन्कमटॅक्स इ. कपाती पगारपत्रकाप्रमाणे वेतन दाखल्यामध्ये नमूद कराव्यात.

कृपया सदरचे परिपत्रक आपल्या शाखेतील सर्व सेवकांच्या निदर्शनास आणावे, ही नम्र विनंती.

(शिवाजी हरी फडतरे)
प्रभारी सरव्यवस्थापक,
दि रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँक लि., सातारा

<u>प्रत माहितीसाठी :-</u>

१. मा.चेअरमनसो / व्हा.चेअरमनसो, सर्व संचालकसो,
दि रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँक लि., सातारा

२. श्री. विभागप्रमुख / शाखाधिकारी,
दि रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँक लि., सातारा मुख्य कार्यालय व सर्व शाखा.

PARIPATRAK-4-2017-18

True Copy

Principal,
Arts & Commerce College
Madha,Dist.Solapur

Scanned by CamScanner

परिपत्रक क्र.१ Staff welfare scheme

सेवक वेल्फेअर फंड,
रयत शिक्षण संस्था, सातारा
दिनांक - १४/११/२०१८

सर्व शाखाप्रमुख,
रयत शिक्षण संस्था
यांना---

विषय - **सेवक वेल्फेअर फंड वर्गणी पाठविणेबाबत.**

सेवकांच्या कुटुंबियांच्या (स्वतः, पत्नी, मुले, मुली, आई, वडिल, पती, इ.) दुर्धर आजारप्रसंगी सेवकांना आर्थिक मदत व्हावी या सामाजिक जाणीवेच्या हेतूने सेवक वेल्फेअर फंडाची योजना आहे. या योजनेची वर्गणी पाठविणेबाबत परिपत्रकाद्वारे शाखाप्रमुखांना दरवर्षी कळविले जाते. परंतु त्याबाबत काळजीपूर्वक अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. तरी आपल्या शाखेने खालीलप्रमाणे पूर्तता करावी.

१) सेवक वेल्फअर फंडाची वर्गणी सर्व शाखांनी पाठविणे आवश्यक आहे.

२) सदरची वर्गणी गतवर्षी ज्या शाखांनी पाठविली नाही, त्यांनी सदर वर्गणी का पाठवू शकला नाही याबाबत चेअरमन, सेवक वेल्फेअर फंड, रयत शिक्षण संस्था, सातारा व आपल्या विभागीय कार्यालयाकडे दि.२०/१२/२०१८ पर्यंत कळवावे.

३) सेवक वेल्फेअर फंडाची सर्व सेवकांची वर्गणी डी.डी/चेकद्वारे **चेअरमन, सेवक वेल्फेअर फंड, रयत शिक्षण संस्था, सातारा** या नावाने दि.१५/२/२०१९ पर्यंत पाठवावी. जे सेवक वर्गणी पाठविणेस असमर्थ असतील त्यांचे अर्ज लेखी खुलाशासह त्यासोबत पाठवावेत तसेच शाखेच्या वर्गणी कपात यादीत नकार असा कॉलम करुन संबंधित सेवकाची सही घ्यावी.

४) सेवकाच्या एक महिन्याच्या एकूण पगाराच्या (पगार+ग्रेड पे+म.भत्ता+सर्व अलौन्सेस,इ.) एक टक्का रक्कम ही सेवक वेल्फेअर फंडाची वर्गणी कपात करुन पाठवावी. सदर वर्गणी म्हणून लमसम रक्कम पाठवू नये.

५) सेवक वेल्फेअर फंडाची वर्गणी खालील पत्त्यावर पाठवावी.
**मा.चेअरमन, रयत सेवक वेल्फेअर फंड,**
**रयत शिक्षण संस्था, सातारा - ४१५००१**
**(फोन व फॅक्स - ०२१६२ - २३१०७४)**

६) सेवक वेल्फेअर फंड मदतीसाठी अर्ज पाठविताना त्यातील माहिती पूर्ण भरुन पाठवावी. अर्जामधील कॉलममध्ये गतवर्षीची व चालू वर्षीची वर्गणी किती व केव्हा पाठविली याची माहिती शाळेच्या रेकॉर्डवरुन नोंदवावी.

येथूनपुढे आपल्या शाखेची सेवक वेल्फेअर फंडाची वर्गणी नियमित पाठविणेची काळजी घ्यावी.

कळावे.

सर्व स्टाफ सही ...
16/11/2018

Arts & Commerce College Madha

(प्रा.डॉ. भाऊसाहेब कराळे)
सचिव,
रयत शिक्षण संस्था, सातारा

प्रत माहितीसाठी -
१) श्री. इन्स्पेक्टर, रयत शिक्षण संस्था, मध्य विभाग, सातारा
२) श्री. इन्स्पेक्टर, रयत शिक्षण संस्था, दक्षिण विभाग, सांगली
३) श्री. इन्स्पेक्टर, रयत शिक्षण संस्था, उत्तर विभाग, अहमदनगर
४) श्री. इन्स्पेक्टर, रयत शिक्षण संस्था, पश्चिम विभाग, पुणे
५) श्री. इन्स्पेक्टर, रयत शिक्षण संस्था, रायगड विभाग, कामोठे

True Copy
Principal,
Arts & Commerce College
Madha, Dist. Solapur

Scanned by CamScanner

प्रा. ताकभाते पी. व्ही. सेवानिवृत्त समारंभ.




Arts & Commerce College Madha

Scanned by CamScanner